आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२ सप्टेंबर २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांच्यासह आंदोलकांना आझाद मैदान रिकामं करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे निर्देश

- मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याकरता हैदराबाद आणि सातारा गॅझेटियरच्या अंमलबजावणीसंदर्भातल्या शासन आदेशाचा मसुदा तयार

- सेमिकॉन इंडिया २०२५ चं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन, भारताची मायक्रोचीप जगाला दिशा देईल असा व्यक्त केला विश्वास

- राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताब्यातल्या अतिरिक्त जमिनींचा व्यापारी तत्वावर त्वरित वापर करायला राज्य शासनाची मान्यता

**आणि**

- यूएस ओपन टेनिस स्पर्धेत महिला एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत नॅओमी ओसाकाची कोको गॉफ हिच्यावर मात

**<><><><>**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांच्यासह आंदोलकांनी आज दुपारी तीनच्या आधी आझाद मैदान रिकामं करावं, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयानं आज दिले. अन्यथा न्यायालयाचा अवमान केल्याबद्दल कारवाई केली जाईल, असा इशारा प्रभारी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठानं दिला. आंदोलकांनी, दिलेल्या परवानगीचं उल्लंघन केलं असून आता त्यांना आझाद मैदानावर आंदोलन करता येणार नाही, त्यांनी तत्काळ ही जागा सोडावी, अन्यथा त्यानुसार आदेश देऊ, असं न्यायमूर्ती चंद्रशेखर म्हणाले.

दरम्यान, आंदोलकांनी न्यायालयाच्या आदेशाचं पालन करावं असं आवाहन मुंबई पोलिसांकडून आझाद मैदान आणि परिसरात सुरू आहे. मात्र आझाद मैदान सोडायला मनोज जरांगे पाटील यांनी नकार दिला आहे. त्याचवेळी कुठलेही रस्ते अडवू नका, पोलिसांना आणि नागरिकांना त्रास देऊ नका असं आवाहन त्यांनी आंदोलकांना केलं आहे.

केवळ ५ हजार आंदोलक, जेवण आणि वैद्यकीय मदतीच्या गाड्यांना आझाद मैदान परिसरात परवानगी देण्याची मागणी त्यांनी पोलिसांना केली आहे. अतिरीक्त आंदोलकांनी गाड्यांसह नवी मुंबईत जावं, अशी सूचना त्यांनी केली आहे.

**<><><>**

मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याकरता हैदराबाद आणि सातारा गॅझेटियरच्या अंमलबजावणीसंदर्भातल्या शासन आदेशाचा मसुदा राज्य सरकारनं तयार केला आहे. मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीच्या आज तीन तास झालेल्या बैठकीनंतर समितीचे सदस्य गणेश पाटील आणि विजय सूर्यवंशी या मसुद्याचं प्रारूप मनोज जरांगे यांना दाखवण्यासाठी निघाले आहेत. जरांगे यांच्याशी चर्चा करून अंतिम प्रारूप तयार केलं जाणार आहे. त्यानंतर मान्यता घेऊन याबाबतचा अंतिम शासन निर्णय काढला जाईल.

**<><><>**

सेमीकंडक्टरमध्ये जगाचा विकास करण्याची शक्ती असून भविष्यात भारताची मायक्रो चीप जगाला दिशा देईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीतल्या यशोभूमी इथं आज सेमिकॉन इंडिया २०२५चं उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं, तेव्हां ते बोलत होते. सेमीकंडक्टर उद्योगाच्या विकासासाठी जग भारतावर विश्वास ठेवतं असं ते म्हणाले. जागतिक चिप बाजारपेठेत भारताच्या वाढत्या प्रभावावर त्यांनी भर दिला. २१ व्या शतकात, या लहान चिप्समध्ये मोठी शक्ती असल्याचं ते म्हणाले.

**- होल्ड बाईट मोदी- -**

येत्या काही वर्षांत जागतिक सेमीकंडक्टर बाजारपेठ एक ट्रिलियन डॉलर्स ओलांडण्याचा अंदाज आहे आणि भारत त्यात महत्त्वाची भूमिका बजावेल, असं मोदी यांनी म्हटलं. २०२१ पासून मंजूर झालेल्या १० सेमीकंडक्टर प्रकल्पांमध्ये १८ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

सेमीकंडक्टर उद्योग केवळ चिप उत्पादनापुरता मर्यादित नसून सरकार एक सेमीकंडक्टर परिसंस्था तयार करत आहे. जी भारताला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक आणि स्वावलंबी बनवेल, असं प्रधानमंत्री मोदी यांनी म्हटलं आहे.

नोएडा आणि बेंगळुरूमधली डिझाइन केंद्रं जगातील काही सर्वात प्रगत चिप्स बनवण्यावर काम करत असल्याचं ते म्हणाले.

या तीन दिवसीय परिषदेचा उद्देश भारताच्या सेमिकंडक्टर परिसंस्थेला गती देणं हा आहे. यामध्ये सेमिकॉन इंडिया कार्यक्रमाची प्रगती, स्मार्ट उत्पादन, संशोधन आणि विकास तसंच कृत्रिम बुद्धिमत्तेमधला नवोन्मेष, गुंतवणूक संधी, राज्यस्तरीय धोरण अंमलबजावणी इत्यादी विषयांवर सत्रं होतील.

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यावेळी उपस्थित होते. इंडिया सेमिकंडक्टर मोहिम सुरू झाल्यापासून जग पूर्ण आत्मविश्वासाने भारताकडे पाहत असल्याचं ते म्हणाले. देशात पाच सेमिकंडक्टर युनिट्सचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. काही महिन्यांत आणखी दोन युनिट्द्वारे उत्पादन सुरू होईलं असं वैष्णव यांनी सांगितलं.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज बिहार राज्य जीविका निधी साख सहकारी संघ लिमिटेडचं दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन केलं. जीविका निधीचं उद्दिष्ट जीविकाशी संबंधित समुदायाला परवडणाऱ्या व्याजदरात सहज निधी उपलब्ध देणं आहे. जीविकाचे सर्व नोंदणीकृत क्लस्टर-स्तरीय महासंघ या संस्थेचे सदस्य होतील. या संस्थेच्या कामकाजासाठी, बिहार सरकार तसेच केंद्र सरकार निधी देणार आहे. प्रधानमंत्र्यांनी संस्थेच्या बँक खात्यात १०५ कोटी रुपये हस्तांतरित केले आहेत. या योजनेद्वारे राज्यातील ग्रामीण महिला उद्योजकांना आता सहज निधी उपलब्ध होईलं असं त्यांनी म्हटलं.

सरकार लखपती दीदी, ड्रोन दीदी आणि बँक सखी सारख्या योजनांद्वारे महिलांचं उत्पन्न वाढवण्यासाठी वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितलं.

<><><><>

संयुक्त अरब अमिरातीसाठी भारताचे नवे राजदूत म्हणून डॉ. दीपक मित्तल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मित्तल हे १९९८च्या कॅडरचे सनदी अधिकारी आहेत.

<><><><>

राज्य सरकारनं एसटी, अर्थात राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताब्यातल्या अतिरिक्त जमिनींचा व्यापारी तत्वावर त्वरित वापर करायला मान्यता दिली आहे. त्यामुळे

महामंडळाच्या उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक स्थैर्य साधण्यात मदत होईल, असं परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितलं.

सरकारच्या सुधारित धोरणानुसार, एसटीच्या अतिरिक्त जमिनींचा विकास PPP, अर्थात सार्वजनिक-खाजगी सहभाग पद्धतीनं केला जाणार आहे. त्यासाठीची भाडेपट्टा कालमर्यादा ४९ वर्षे, अधिक ४९ वर्षे, अशी एकूण ९८ वर्षे इतकी असेल. या कालावधीत संबंधित जमिनींचा व्यापारी वापर करून मिळणाऱ्या उत्पन्नाचा ठराविक हिस्सा एसटी महामंडळाला जमा करणं बंधनकारक असेल.

या निर्णयामुळे महामंडळाच्या ताब्यातली निष्क्रिय जमीन वापरात येईल, नव्या प्रकल्पांना चालना मिळेल, तसंच एस.टी. महामंडळाला मोठा आर्थिक फायदा झाल्यामुळे प्रवाशांना दर्जेदार सेवा पुरवता येईल, असं सरनाईक म्हणाले.

**<><><><>**

यंदाच्या आर्थिक वर्षी एप्रिल ते ऑगस्ट दरम्यान भारतातल्या व्यावसायिक कोळसा खाणींमधलं उत्पादन गेल्या वर्षीच्या तुलनेत ११ पूर्णांक ८८ शतांश टक्क्यांनी वाढल्याची माहिती कोळसा मंत्रालयानं दिली आहे. यंदा कोळशाचं उत्पादन १ कोटी ४४ लाख ३० हजार टन उत्पादन नोंदवलं गेलं आहे. कोळशाच्या उत्पादनामुळे वीज निर्मिती, पोलाद उत्पादन, सिमेंट निर्मिती अशा प्रमुख उद्योगांना बळ मिळतं, त्यामुळे भारताच्या औद्योगिक पायाभूत सुविधांचा कणा मजबूत होतो, असंही मंत्रालयाने म्हटलं आहे. मंत्रालयाने या क्षेत्राच्या सुधारित कामगिरीचं श्रेय धोरणात्मक उपाययोजना, कठोर देखरेख आणि भागधारकांच्या सातत्यपूर्ण पाठिंब्याला दिलं आहे.

**<><><><>**

यूएस ओपन टेनिस स्पर्धेत महिला एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत नॅओमी ओसाका हिनं कोको गॉफ हिच्यावर ६-३, ६-२ अशी सहज मात केली. तिचा पुढचा सामना कॅरोलीना मुकोव्हा हिच्याविरुद्ध होणार आहे. पुरुष एकेरीत फीलिक्स ओजेर अलीयासीम यानं आंद्रे रुबलेव्ह याचा थेट सेट्समध्ये पराभव केला. २४ वेळा ग्रँडस्लॅम अजिंक्यपद विजेता नोव्हाक जोकोविच याच्यासमोर उद्या टेलर फ्रिट्झ याचं आव्हान असेल.

**<><><><>**

ना◌ॅर्वेतल्या ऑस्लो इथं २३ ते ३० ऑगस्ट या कालावधीत झालेला होमलेस वर्ल्ड कप २०२५ संपन्न झाला.  या स्पर्धेत जगभरातल्या ४० पुरुष आणि २४  महिला संघांनी भाग घेतला. या स्पर्धेत नागपूरच्या पुरुष संघानं १५ वं, तर महिला संघानं ८ वं स्थान मिळवलं.

<><><><>

बीड जिल्ह्यातल्या अंबाजोगाई इथं माजी पोलीस निरीक्षक सुनील नागरगोजे यांनी त्यांच्या राहत्या घरी काल गळफास घेऊन आत्महत्या केली.  नागरगोजे हे मूळचे परळी तालुक्यातल्या नागदरा इथले रहिवासी होते. पोलीस दलात रुजू असतांना परभणी, लातूर, आणि बीड इथं  सेवा बजावली होती.

<><><><>

अमरावती जिल्ह्यातला अप्पर वर्धा जलाशयातला पाणीसाठा ९५ पूर्णांक ७९ टक्के इतक्या क्षमतेपर्यंत पोहोचल्यामुळे पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. सध्या अप्पर वर्धा धरणाचे १३ दरवाजे ५०९ घनमीटर प्रतिसेकंद इतका विसर्ग करण्यात येत आहे. हा विसर्ग वर्धा नदीपात्रात सोडण्यात येत असून त्यामुळे नदीकाठच्या गावांनी सतर्क राहण्याचं आवाहन उर्ध्व वर्धा प्रकल्प पूर नियंत्रण कक्षाकडून करण्यात आलं आहे.

<><><><>

आताच हाती आलेल्या बातमीनुसार, मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील हे मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांच्या भेटीला निघाले आहेत. मराठा आरक्षणासाठी तयार केलेल्या मसुद्याने जरांगे यांचं समाधान होईल असं विखे म्हणाले.

//<><><><>//